REGISTERED No. B. 3434




# अर्थ

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १ जून, १९४९ | अंक २२


दी

## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे
सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा
पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

**स्थापनाः १९२६.**

मुख्य कचेरी :

**सर वर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.**

तार : **BANKOP** फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट– - ) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रक व्यवहार केले जातात—

**मुख्य कचेरींत २. ० डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.**

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## *बांठीया बँक लिमिटेड*

पनवेल ( कुलाबा )

स्थापना १९४३

| | |
|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ४,७७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ४२,००० |
| खेळतें भांडवल | रु. ५०,००,००० |

शाखा

**मुंबईः**- ६५-६७ झव्हेरी बझार. **बेलापूररोडः**–पोस्टासमोर
**पुणेंः**–१२६८ भवानी पेठ. **कल्याणः**–शिवाजी चौक
**अहमदनगरः**–बझार पेठ. **भिवंडीः**–बझार पेठ

चेअरमनः–**श्री. रतनचंद भिकमदास बांठीया**

मॅनेजिंग डिरेक्टरः–**श्री. विरदीचंद भूरचंद बांठीया.**

डायरेक्टर्सः–श्री. केशरचंद आनंदराम बांठीया, श्री. गंगाधर विष्णू पुराणिक, श्री. सिवराज आनंदराम बांठीया, श्री. रावजी भिमजी रंगपर्गीया. ( ऑ. मॅजिस्ट्रेट ), श्री. केशव गोविंद लिमये, बी. ए., एलएल. बी., श्री. जे. एस्. कासट, बी. कॉम., श्री. चुनिलाल जसरुप मुनोथ, श्री. सोराबजी रुस्तोमजी घासवाला.

जनरल मॅनेजरः—**श्री. गणेश भैरव साठे.**

*बँकिंगचीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात. विशेष माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा.*

**आर. पी जोशी,** B. A., Cert. A. I. I. B.
मॅनेजर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें







## सर्व प्रसिद्ध माल

भिंतीला लावण्याचे व उभे ठेवण्याचे छोटे दिवे

| | |
|---|---|
| केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, ( शाखा ) मेनरोड, नाशिक. |

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


## विविध माहिती

**पूर्व पंजाबांत खताचा नवा कारखाना**—वर्धा येथील आश्रमांतील श्री. वाळुणकर ह्यांना पूर्व-पंजाब सरकारनें बोलावून घेतलें आहे. पूर्व पंजाबांत हाडापासून खत तयार करण्याचा कारखाना काढतां येईल किंवा काय, ह्यासंबंधीं त्यांनीं अहवाल सादर करावयाचा आहे. त्याशिवाय पूर्व पंजाबांत कातडी कमावण्याच्या धंद्याची संघटना करण्याचें कामही त्यांच्याकडे सोपविण्यांत आलें आहे. श्री. वाळुणकर हे वर्धा येथील कातड्याच्या कारखान्याचें काम पहात असतात.

**२० टन वजनाचा माग**—कापडाचें कापड विकणारा सर्वांत मोठा माग यॉर्कशायरमधील एका कारखान्यानें बनविला आहे. तो पूर्ण होण्यास २॥ वर्षें लागलीं. ह्या मागाचें वजन २० टन आहे. त्याला एका वेळीं १६,००० पौंड सुताचा पुरवठा लागतो. साध्या मागापेक्षां १० टन अधिक वजनाचे आणि १२ फुटांपर्यंत रुंदीचें कापड ह्या मागावर काढतां येतें. मागाचा धोटा ३५ ते ४० मैल वेगानें फिरतो.

**मार्शल योजनेच्या मदतींत कपात ?**—अमेरिकेच्या कनिष्ठ विधिमंडळाच्या आर्थिक समितीनें युरोपला जुलै १९४९ पासून मिळणाऱ्या मार्शल योजनेच्या रकमेंत १५ टक्के कपात करण्याची शिफारस केली आहे.

**बंगालमधील निर्वासित**—पश्चिम बंगाल सरकारनें सुंदरबन ह्या समुद्रकिनाऱ्यालगतच्या भागांत पूर्व बंगालमधून आलेल्या निर्वासितांसाठीं बरींच नवीन खेडीं वसविण्याचें ठरविलें आहे, असें समजतें.

**सोलापूर जिल्ह्यांतील धान्यवसुली**— सोलापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनीं धान्य-वसुलीच्या बाबतींत चांगला उत्साह दाखविला आहे. आतांपर्यंत ठरलेल्या वसुलीपेक्षांही अधिक म्हणजे ८०,६८८ टन धान्य वसूल झालें आहे. ठरलेल्या वसुलीपेक्षां हा आकडा ११ टक्क्यांनीं अधिक आहे.

**बेगमपेठ येथील विमानतळ**— हैद्राबादच्या जवळ असलेला बेगमपेठ येथील विमानतळ ह्या वर्षअखेर अधिक विस्तृत करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठीं १०६ लाख रुपये खर्च होतील. विमानाला उड्डाण करण्यासाठीं आणि उतरण्यासाठीं दोन पक्क्या सडका तयार करण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं एकीची लांबी ६,६०० फूट आणि दुसरीची ४,८०० फूट राहील. विमानतळावर तीन हँगर्सही बांधण्यांत येणार आहेत.

**पहिले बंगाली सार्जंट**— कलकत्त्याच्या पोलिस दलांत सार्जंटच्या जागा बंगाली तरुणांना प्रथमच देण्यांत आल्या आहेत; आतांपर्यंत सार्जंटच्या जागा फक्त युरोपिअन्स अगर अँग्लो इंडिअन्स ह्यांनाच मिळत असत.

**नागरिकांना चित्रपटद्वारां शिक्षण**— नागरिकांना शिक्षण देण्यासाठीं कटक जिल्ह्यांतील पोलिसांमार्फत एक चित्रपट दाखविण्यांत येणार आहे. ह्या चित्रपटांत रस्त्यावरील अपघात, खून, चोरी इत्यादी प्रसंग दाखवून अशा प्रसंगीं नागरिकांचीं कर्तव्यें कोणतीं तें दिग्दर्शित करण्यांत येणार आहे.


**घरें बांधण्यासाठीं परदेशी सिमेंट**—संयुक्त-प्रांत सरकारनें प्रांतांतील घरें बांधण्याच्या आपल्या योजना पुऱ्या करण्यासाठीं परदेशांतून ६०,००० टन सिमेंट विकत घ्यावयाचें ठरविलें आहे, असें समजतें.

**नवा रेल्वेचा रस्ता**—असाम आणि हिंदुस्थान ह्यांना जोडणारा २०० मैल लांबीचा एक नवा रेल्वेचा रस्ता १९५० च्या फेब्रुआरीपर्यंत तयार करण्याचें ठरलें आहे. हा रस्ता सर्वस्वी हिंदी संघराज्याच्या प्रदेशांतूनच काढण्यांत येणार आहे. ह्या कामावर ७,००० मजूर खपत असून, रस्त्यापैकीं १४५ मैल लांबीचा रस्ता अगदीं नवीनच तयार होणार आहे. बराचसा रस्ता तयार होत आला आहे. नद्यांवरील पूल मात्र व्हावयाचे आहेत. हा नवा रस्ता तयार करतांना १ लाख टन वजनाचें सामानसुमान वाहून न्यावें लागलें. सध्यांचा रेल्वेचा रस्ता पूर्व-पाकिस्तानांतून गेलेला आहे.

**हिंदुस्थानसाठीं मोटार-रिक्षा**—बर्मिंगहॅम येथें अतिपूर्वेकडील देशांसाठीं आणि हिंदुस्थानसाठीं म्हणून खास मोटार-रिक्षा बांधण्यांत येत आहेत. ह्या रिक्षांची चांचणी करण्यासाठीं एक रिक्षा ८८ मैल पळविण्यांत आली. हा प्रवास रिक्षानें १५ तासांत केला. एवढ्या प्रवासांत किरकोळ दुरुस्तीसाठीं तिला फक्त एकदांच थोडा वेळ थांबावें लागलें.

**बँकांच्या नोकरांचा संभाव्य संप**— हिंदुस्थान सरकारनें बँका आणि विमा कंपन्या ह्यांच्याबाबत उत्पन्न होणाऱ्या तंट्याविषयीं नुकताच एक वटहुकूम प्रसिद्ध केला आहे. ह्या हुकुमाविरुद्ध निषेध प्रकट करण्यासाठीं मुंबईच्या फेडरेशन ऑफ बँक एंप्लॉयीज ह्या मध्यवर्ती संस्थेच्या जनरल कौन्सिलनें एक दिवसाचा संप करण्याचें ठरविलें आहे. संपाची तारीख अजून ठरावयाची आहे. ह्या निषेध-संपांत हिंदुस्थानांतील सर्व बँकांच्या आणि विमा कंपन्यांच्या नोकरांनीं भाग घ्यावा अशी विनंति करण्यांत येणार आहे.

**इराणचें रशियाकडे येणें असलेलें कर्ज**— रशियाकडून इराणला जवळ जवळ २,००,००,००० डॉलर्स येणें असून, त्याबाबत रशिआ कांहीं भाषा काढीत नाहीं, अशी तक्रार इराणच्या परराष्ट्र मंत्र्यानें केली आहे. ह्यापैकीं १,००,००,००० डॉलर्स जकातीबद्दलचें आणि १०,००,००० डॉलर्स रेल्वेच्या भाड्याचें आहेत.




# अर्थ

बुधवार, ता. १ जून १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## साहित्यिकांचा परराष्ट्रीय व्यापारास हातभार

### महत्त्वाची राष्ट्रीय कामगिरी

ग्रेट ब्रिटनमधील प्रकाशकांनीं गेल्या वर्षी ११३/४ कोटी रुपये किंमतीच्या पुस्तकांची निर्गत केली. ह्याचा अर्थ, त्यांच्या एकूण विक्रीच्या एक चतुर्थांशाइतकीं पुस्तकें निर्गत झालीं. १० वर्षांपूर्वी ४ कोटी रुपयांचीं पुस्तकें त्यांनीं निर्गत केलीं होतीं. जर्मनी आणि जपान ह्या देशांत युद्धापूर्वी पुष्कळ ब्रिटिश पुस्तकें खपत असत. तेथील विक्री आतां थांबली, तरी सुद्धां निर्गतींत एवढी मोठी वाढ झालेली आढळते. कागदाचा पुरवठा वाढला असल्यानें ब्रिटिश प्रकाशकांचा निर्गत व्यापार आणखी विस्तार पावण्याचा संभव आहे. ब्रिटिश वाङ्मयाला ज्या मानानें जागतिक मागणी आहे, त्या मानानें ग्रेट ब्रिटनमध्यें पुस्तकांची आयात होत नाहीं. त्याकारणानें, ग्रेट ब्रिटनला आपलीं पुस्तकें इतर देशांत विकून त्यांचे मोबदल्यांत इतर कांहीं माल खरीदतां येतो. इंग्रज ग्रंथकार, लेखक, नाटककार, कवी, कादंबरीकार इत्यादींचा अशा रीतीनें राष्ट्रीय आर्थिक संसारास महत्त्वाचा हातभार लागतो. त्यांचें लिखाण व तें प्रसिद्ध करणारे प्रकाशक यांच्या सहकार्यामुळें ग्रेट ब्रिटनला परराष्ट्रीय हुंडणावळ मिळवतां येते आणि ह्या साहित्याचा उपयोग परदेशांत ग्रेट ब्रिटनबद्दल आपुलकी निर्माण होण्याकडेहि होतो. ब्रिटिश लोक चांगले, त्यांची रहाणी चांगली, त्यांचे रीतिरिवाज चांगले, त्यांचा माल उत्कृष्ट, अशा तऱ्हेचा अप्रत्यक्ष प्रचार त्यामुळें होतो आणि सहाजिकच ग्रेट ब्रिटनच्या राजकीय व आर्थिक वर्चस्वास योग्य अशी पार्श्वभूमि तयार होते. विशेषतः मागसलेल्या देशांत ह्याचा परिणाम अधिक होतो. इंग्रजांनीं लिहिलेल्या पुस्तकांतून इंग्रज संशोधक व शास्त्रज्ञ ह्यांच्या कार्याचे महत्त्वावर विशेष भर दिलेला असतो आणि हीं पुस्तकें वाचून तयार झालेले लोक सहाजकच इंग्रजी बनावटीचा माल मागवूं लागतात !

पुस्तकांचा हा परिणाम ब्रिटिश सरकारास पूर्णपणें माहीत आहे. जर्मनी जिंकल्यानंतर, तेथील शाळांत चालू असलेलीं पुस्तकें रद्द करून, इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें त्याऐवजीं चालू करण्याच्या उपक्रमाचें रहस्य वरील विवेचनावरून लक्षांत येईल. ह्यासंबंधांतलि एक ताजें उदाहरण देतां येण्याजोगें आहे. हिंदुस्थानांतील बॉइलर्ससंबंधीं कायदा इंग्लिश बॉइलर्सना अनुलक्षून केलेला आहे, त्यामुळें हिंदुस्थानांत अमेरिकन बनावटीचे बॉइलर्स खपूं शकत नाहींत, अशी तक्रार दिल्लींतील अमेरिकन वकिलातीनें हिंदुस्थान सरकारकडे नुकतीच केली आहे. हा कायदा असा होण्यास हिंदुस्थानवरील ब्रिटिशांचें राजकीय वर्चस्व जसें कारणीभुत झालें, तसेंच ब्रिटिश पुस्तकें व शिक्षण हींहि कारणीभूत झालीं, हें स्पष्ट आहे. परराष्ट्रीय व्यापाराशीं वाङ्मयाचा कसा संबंध पोंचतो आणि साहित्यिकहि राष्ट्राच्या आर्थिक संसारास कसा हातभार लावूं शकतात, हें पहाणें मोठें उद्बोधक आहे. हिंदी पुस्तकांचा खप बाहेर देशांत होऊं लागला, तर हिंदुस्थानांतील साहित्यिकांचाहि असाच हातभार लागू शकेल. त्याला अनेक अडचणी आहेत, हें अर्थात् निर्विवाद आहे. गांधी—टागोर—नेहरू इत्यादींच्या ग्रंथनिर्मितीनें ही कामगिरी बजावली आहे. हिंदुस्थानकडे प्रवासी आकर्षिले जाऊन त्यांना येथें पैसा खर्चण्यास लावण्याचें कार्यहि त्यामुळें थोडें-फार झालें आहे. ब्रिटिश वाङ्मयानें कितीतरी प्रवासी ब्रिटनकडे आजवर खेचून नेलेले आहेत ! ग्रंथकारांची व प्रकाशकांची ही राष्ट्रीय कामगिरी अत्यंत मौल्यवान असते आणि त्यासाठी परदेशांत ग्रंथ मुद्दाम कमी किंमतीनें विकतां यावेत अशी व्यवस्था केलेली असते. स्वदेशांतील किंमतीपेक्षां परदेशांतील किंमत कमी ठेवल्यानें पुस्तकांच्या प्रत्यक्ष निर्गतींत वाढ होतेच, परंतु त्याबरोबरच इतर अनेक प्रकारांनीं परदेशांचा पैसा खेचून आणण्याचा प्रचारहि साधतो.

## पोलादाच्या नवीन कारखान्यांची उभारणी

हिंदमध्यें पोलादाचें उत्पादन १९४८ सालीं अंदाजी ८ लक्ष ५० हजार टन झालें व कारखान्यांच्या पूर्ण शक्तीइतकें उत्पादन झालें असतें तर एकंदर पोलादाची निर्मिति १२ लक्ष, ६४ हजार टन झाली असती. परंतु देशाची पोलादाची सध्याची मागणी २५ लक्ष टनांची आहे. म्हणजे, मागणीच्या तृतीयांश पोलाद देशांत तयार होतें. हिंद सरकारच्या औद्योगिक धोरणाप्रमाणें यापुढें लोखंड व पोलाद यांचे नवीन कारखाने काढणें ही केवळ सरकारी बाब राहणार आहे. फार तर अस्तित्वांत असलेल्या कारखान्यांची वाढ करावयास सरकार परवानगी देईल.

पोलादाचा धंदा हा आधारभूत धंदा समजला जातो व यंत्रसामुग्री आणि औद्योगीकरण यांच्या दृष्टीनें ह्या धंद्याला विशेष महत्त्व आहे. हिंद सरकारच्या मनांतून दर वर्षी १० लक्ष टन पोलाद तयार होईल असा एक किंवा प्रत्येकीं ५ लक्ष टन उत्पादनाचे दोन कारखाने उभारण्याचा उद्देश आहे, व ह्या बाबतींत कोठें व किती उत्पादनाचा कारखाना उभारावा याबद्दल तीन तज्ज्ञ कंपन्यांना सरकारनें सल्ला विचारला होता. यांपैकी मेसर्स कोपर्स अँड कंपनी व ऑर्थर जी. मॅकी ह्या कंपन्या अमेरिकन असून, इंटरनॅशनल कन्स्ट्रक्शन कंपनी ही इंग्लिश आहे. मेसर्स कोपर्स व इंटरनॅशनल कन्स्ट्रक्शन ह्या कंपन्यांनीं प्रत्येकीं ५ लक्ष टन उत्पादनाचे दोन स्वतंत्र कारखाने काढावे असें सुचविलें आहे; परंतु ऑर्थर मॅकी यांनीं कोणत्याहि एकाची शिफारस न करतां ५ व १० लक्ष टन अशा दोनहि आकाराच्या कारखान्यांबद्दल योजना सादर केली आहे.

कारखाना उभा करण्यासाठी एक टन पोलादाच्या उत्पादनासाठीं भांडवली खर्च एक हजार रुपये करावा लागेल असा तज्ज्ञ कंपन्यांचा अंदाज आहे. तेव्हां ५ लाख टनांच्या कारखान्याला भांडवली खर्च अंदाजीं ५० कोटी रुपये येईल; व दोन कारखान्यांचा खर्च १०० कोटी रुपये होईल. भांडवलाची एवढी मोठी रक्कम कशी उभारावयाची हा प्रश्न बाजूला ठेवला तरी कारखान्याची एकंदर अंमलबजावणी त्वरित करावयाची म्हटल्यास

उभारणी व सुरवात व्हाला पांच वर्षे लागतील व प्रत्यक्ष पोलादाच्या उत्पादनाला व्यवस्थित सुरवात व्हावयास आणखी दोन वर्षे लागतील. म्हणजे, कारखान्यांच्या योजनेला मूर्त स्वरूप आजपासून सात वर्षांनीं येणार! ह्या दरम्यानच्या सात वर्षांत पोलादाच्या उत्पादनाची जागतिक परिस्थिति निश्चितपणें सुधारणार आहे. अमेरिका, इंग्लंड व बेल्जम ह्या पोलाद तयार करणाऱ्या देशांचे ह्या दृष्टीनें प्रयत्न सुरू आहेतच. मध्यंतरींच्या काळांत जास्त पुरवठा व मागणीचा ताण कमी होणें, यामुळें बाजारभावहि उतरण्याचा संभव आहे. हिंदला मात्र आज वाढलेल्या बाजारभावानें कारखान्यांसाठी भांडवली खर्च करावा लागेल.

टाटांचा कारखाना, म्हैसूर आयर्न ॲंड स्टील वर्क्स व स्कॉबच्चा कारखाना यांच्याहि स्वतःचें पोलादाचें उत्पादन वाढविण्याच्या योजना आहेत. ह्या तिनींहि कारखान्यांना पोलादाच्या उत्पादनांत वार्षिक सहा लक्ष टनांची वाढ करतां येईल, व त्यासाठी नहि कारखान्यांना एकंदर भांडवली खर्च ३० कोटी रुपयांचे सुमारास करावा लागेल असा अंदाज आहे. म्हणजे, सरकारी योजनेपेक्षां खाजगी कारखानदारांना एकंदरींत बराच कमी भांडवली खर्च येईल. तेव्हां अशा परिस्थितींत वरील तीनहि खाजगी कारखानदारांना कारखान्यांची वाढ करण्यासाठी मदत करणें जास्त श्रेयस्कर व फायदेशीर ठरेल, असें कांहीं तज्ज्ञांचें मत आहे. कारखान्यांची उभारणी कोठें करावी, हें सरकार प्रांतांशीं चर्चा करून ठरवीत आहे.

'भावी काळांत हिंदमध्यें पोलादाला मागणी पुढील कारणांमुळें तीव्र स्वरूपाची व वाढतीच असेल. निरनिराळ्या प्रकारच्या घरांची खाजगी, सहकारी प्रयत्नांनीं व सरकारकडून बांधकामें, दामोदर धरणाप्रमाणें बांधकामाच्या मोठ्या योजना, मोटारी व रेल्वे इंजिनें व रेल्वेचें साहित्य यांचें उत्पादन, मशीन टूल्स बनविणें, हरतऱ्हेची यंत्रसामुग्री इ.

### कोशी नदीवरील धरणाचा नकाशा पुरा होत आला.

'कोशी नदीवर बांधण्यांत येणाऱ्या प्रचंड धरणाचा अखेरचा नकाशा पुरा करण्याचे कामीं तीन अमेरिकन तज्ज्ञांचा सल्ला घेण्यांत येत आहे. ह्या तिघांनीं धरणाचे जागीं समक्ष जाऊन पहाणी पुरी करून नंतर दिल्ली येथें विचारविनिमय केला. त्यांनीं आपला रिपोर्ट हिंदुस्थान सरकारास सादर केला आहे. धरणाचे नमुने तयार करून त्यावर प्रयोग करण्याचें काम यु. स्टे. ब्यूरो ऑफ रिक्लमेशन अमेरिकेंत लवकरच सुरू करील आणि त्यासाठी कांहीं हिंदी तंत्रज्ञ येथून अमेरिकेकडे लवकरच रवाना होतील. धरणाच्या प्राथमिक कामास चार महिन्यांत प्रारंभ होईल. प्रत्यक्ष धरण नेपाळचे हद्दींत बांधलें जावयाचें आहे. हें धरण ७६० फूट उंच, म्हणजे जगांतील सर्व धरणांत उंच होईल. धरणाच्या जागेशीं दिल्ली येथील मध्यवर्ती कचेरीचें संदेशाचें दळणवळण रेडिओद्वारां चालू झालें आहे.

### अमेरिकेंतील ३७% शेतांवर टेलिफोन

अमेरिकेंतील शेतांपैकी ३७% शेतांवर टेलिफोन आहेत. न्यू इंग्लंड संस्थानांतील शेतांपैकी ७२% शेतांवर टेलिफोन आहे. पूर्व, दक्षिण व मध्य-अमेरिकेंतील संस्थानांमधील शेतांपैकी १२% शेतें टेलिफोनशीं जोडलेलीं आहेत.

## हिंदी साखरेचें उत्पादन

### (१९४८-४९)

हिंदी संघराज्यांतील १९४८-४९ सालांतील साखरेच्या उत्पादनासंबंधीं कानपूर येथील इंडियन इन्स्टिटयूट ऑफ शुगर टेकनॉलजी ह्या संस्थेतर्फे अंदाज प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ह्या अंदाजांत तीन वैशिष्ट्यें आढळून येतात. (१) साखरेच्या उत्पादनांत थोडीशी घट, (२) उसापासून होणाऱ्या साखरेच्या उताऱ्यांत थोडीशी वाढ आणि (३) साखरेचा हंगाम कमी काळ चालणें.

ह्या हंगामांत १३४ साखरेचे कारखाने चालू होते. १९४७-४८ सालाच्या हंगामांतहि इतकेच कारखाने चालू होते. ह्या वर्षी साखरेच्या कारखान्यांच्या हंगामाला जरा उशिरा प्रारंभ झाला. निरनिराळ्या प्रांतांतील कारखाने चालू असलेल्या दिवसांची संख्या कमी जास्त आहे; सर्व हिंदुस्थानचा विचार करता चालू हंगामांत १०६ दिवस काम चालू असावें. १९४७-४८ सालीं ११० दिवस काम चालू होतें. चालू हंगामांत साखरेचें एकूण उत्पादन १०.३० लाख टन होईल असा अंदाज आहे. १९४७-४८ सालीं साखरचें उत्पादन १०.७५ लाख टन झालें होतें. ह्या आकड्यावरून उत्पादन ४५,००० टनांनीं कमी होईल असें दिसतें. साखरेच्या उताऱ्याच्या बाबतींत निरनिराळ्या प्रांतांत वेगळा अनुभव येण्याचा संभव असला तरी सर्व हिंदुस्थानांत मिळून साखरेचा उतारा ९.९२ टक्के पडला असें वाटतें. १९४७-४८ सालीं उतारा ९.८५ टक्के पडला होता. खालील तौलनिक तक्त्यांत आकडेवार माहिती दिली आहे.

| प्रांत | कारखान्यांची संख्या | गाळला गेलेला ऊस (टन) | साखरेचें उत्पादन (टन) | उतारा % |
|---|---|---|---|---|
| संयुक्त प्रांत | ६५ (६३) | ५७,१८,८८० (६१,२३०००) | ५,६३,७०० (५,९९,९००) | ९.८६ (९.८०) |
| बिहार | २९ (२९) | १८,११,००९ १६,०५,९०० | १,८७,३०० (१,६८,५००) | १०.३४ (१०.४९) |
| पूर्व पंजाब | १ (१) | ११,२४,९०० (१,२५,३००) | १२५०० (१२,३००) | १०.०१ (९.८६) |
| मद्रास | १० (११) | ५,५०,७०० (६,८५,८००) | ५०,५०० (५९,३००) | ९.१७ (८.६५) |
| मुंबई | १० (१०) | ७,४४,९०० (८,१०,९००) | ८०,४०० (९९,६००) | १०.७९ (११.०५) |
| प. बंगाल व आसाम | १ (२) | ४०,३०० (४८,१००) | ४,००० (५,२००) | ९.९३ (१०.८४) |
| ओरिसा | १ (१) | ३९,७०० (३५,६००) | ४,००० (३,५००) | १०.०८ (९.७०) |
| हिंदी संस्थानें | १७ (१७) | १३,४५,८०० (१४,७६,१००) | १,२७,४०० (१,३६,५००) | ९.४७ (९.२४) |
| एकूण | १३४ (१३४) | १,०३,७६,५०० (१,०९,१०,७००) | १०,२९,८०० (१०,७४,८००) | ९.९२ (९.८५) |

टीप—कंसांतील आंकडे १९४७-४८ सालाच्या हंगामाचे निदर्शक आहेत.

## प्रांतिक गव्हर्नरांचे खर्च ( १९४९–५० )

इतके दिवस प्रांतिक गव्हर्नर हे बादशहांचे प्रतिनिधी समजले जात व त्यामुळें गव्हर्मेन्ट हाउसचा इतमाम राखण्यासाठी मोठाला खर्च करावा लागे. गव्हर्नरास व्यापक अधिकार असत. आतां गव्हर्नरांचें महत्त्व त्यांच्या स्थानावर अवलंबून राहिलेलें नसून, तें त्यांच्या वैयक्तिक गुणांवर अवलंबून असतें. गव्हर्नरांच्या रहाणींत व खर्चांत आतां बदल होणें अपरिहार्य आहे. परंतु खालील तक्त्यावरून ह्या बाबतींत अद्याप सुधारणेस पुष्कळच वाव आहे, असें दिसून येईल. गव्हर्नरांचा पगार सर्व प्रांतांत सारखा असला, तरी इतर खर्चांत फार तफावत आढळते व तिचें समर्थनहि करणें कठीण आहे. गव्हर्नरांच्या खर्चांत काट करून तो योग्य पातळीवर आणला तर दरसाल सुमारें १५ लाखांची बचत होणें अगदी शक्य आहे.

( आंकडे हजार रुपयांचे )

| खर्चाच्या बाबी | मद्रास | प. बंगाल | मुंबई | सं. प्रांत | बिहार | आसाम | ओरिसा | पू. पंजाब | मध्यप्रांत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ गव्हर्नराचा पगार | ६६ | ६६ | ६६ | ६६ | ६६ | ६६ | ६६ | ६६ | ६६ |
| २ सेक्रेटरी–स्टाफ | ५५·६ | १५०·१ | ८१·० | ७९.२ | ७६·९ | ८५·५ | ७८·० | ४७·८ | १९·९ |
| ३ गव्हर्नराचा घरगुती खर्च | २५७·८ | १७२·७ | २४२·० | १०५·४ | १००·३ | ८०·१ | ५८·७ | ८०·८ | ६६·२ |
| ४ सम्च्युअरी अलावन्स | २२·५ | ३०·० | २०·० | १५·० | ६·० | ७·५ | १२·० | ९·० | ७·५ |
| ५ कॉन्ट्रॅक्ट अलावन्स | १६०·० | १३४·५ | ११३·० | २१·५ | २७·६ | ३५·० | २७·४ | ३९·४ | २३·० |
| ६ फिरती खर्च | १७१·० | ९०·७ | ६९·० | १२०·६ | ६५·८ | ५५·० | ५५·४ | ५१·१ | ३१·१ |
| एकूण | ७३२·९ | ६४४·० | ५९१·० | ४०७·७ | ३४२·६ | ३२९·२ | २९७·५ | २९४·० | २१३·६ |

## दि मिरज स्टेट बँक लि., शेड्यूल्ड बँक झाली

दि मिरज स्टेट बँक लि. ही बँक १९२९ सालीं मिरज येथें स्थापन झाली आहे. मिरज स्टेटचे श्रीमंत राजेसाहेब यांचा आश्रय व सक्रीय सहानुभूति बँकेच्या वाढीला व प्रगतीला कारणीभूत झाली आहे. मिरज संस्थान विलीन झालें असलें तरी मिरजेचे श्रीमंत राजेसाहेब व राजघराण्यांतील इतर मंडळी यांचा बँकेस फार मोठा आधार आहे. मिरजेचे व्यापारी व इतर सर्व पेशांतील नागरिकांचा व मिरजेबाहेरच्याही नागरिकांचा विश्वास बँकेवर अढळ असून उत्तरोत्तर तो वाढत आहे.

१९२९ सालीं केवळ २० हजार वसूल शेअर भांडवलावर बँक चालू झाली. आज तिचें सहा लाख वसूल शेअर भांडवल आहे. रिझर्व्ह फंड व इतर फंडस् ५ लक्ष १५ हजारांचेवर आहेत, व खेळतें भांडवल ६० लाखांचेवर आहे.

गेल्या डिसेंबर महिन्यांत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे ऑफीसर्सनीं बँकेची तपासणी केली असून रिझर्व्ह बँकेनें मिरज स्टेट बँकेस 'शेड्यूल्ड बँक' म्हणून मान्यता दिली आहे, व शेड्यूल्ड बँकांचे यादींत मिरज स्टेट बँकेचें नांव समाविष्ट केलें आहे.

बँकेच्या शाखा, पंढरपूर, कुर्डुवाडी व लक्ष्मेश्वर येथें आहेत. मिरजेचें मुख्य ऑफीस व शाखामार्फत सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

बँकेचे चेअरमन श्री. डॉ. कृ. गो. गोसावी हे असून श्री. कानिटकर वकील, श्री. कुरणे वकील, श्री. जी. व्ही. वैद्य, डॉ. खातखंडे ही मंडळी डायरेक्टर्स बोर्डांत आहेत. बँकेची होत असलेली प्रगति व शेड्यूल्ड बँक म्हणून तिला मिळालेला मोठा दर्जा दोन्ही गोष्टींचें श्रेय डायरेक्टर्सना आहे.

## रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा

( २०–५–१९४९ )

| | | रु. |
|---|---|---|
| बँकेनें काढलेल्या एकूण नोटा | | १२१०,९५,९८,००० |
| नोटांस तारण | रु. | |
| सोनें | ४०,०१,७१,००० | |
| परदेशी रोखे | ७१०,३४,३८,००० | |
| रुपये | ४६,८७,६६,००० | |
| हिं. सरकारचे रोखे | ४१३,७२,२३,००० | |
| | १२१०,९५,९८,००० | |
| | | १२१०,९५,९८,००० |

## शेतीस सहकारी पद्धतीनें वीज–पुरवठा

बार्डोली येथें शेतकऱ्यांची एक सहकारी वीज पुरवठा सोसायटी स्थापन करण्यांत आली आहे. विहिरींतून पाणी खेचण्यासाठी वीज निर्माण करणाऱ्या पॉवर हाउसची उभारणी सुरू झाली आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास, मोठ्या प्रमाणावर अशा सोसायट्यांचा प्रसार करता येईल. शेतकऱ्यांनीं घाऊक वीज सरकारकडून विकत घेऊन ती आपसांत वाटण्याच्या योजना हातीं घेतल्या, तर त्यांसहि सरकार मदत करील.

## पोलसन लि.

वरील कंपनीनें १९४८ मध्यें १ कोटी, ९ लक्ष रुपयांची विक्री करून ७ लक्ष, ९० हजार रु. निव्वळ नफा मिळविला. ७½% डिव्हिडंड मिळणार आहे.

## हिंदी कारखानदारींत ब्रिटिशांचा प्रवेश

हिंद सरकारनें कांहीं ब्रिटिश कारखानदारांना हिंदुस्थानांत कारखाने काढण्याची परवानगी दिल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. ह्या कारखानदारींवर फक्त एकच महत्त्वाची अट घालण्यांत आली आहे. हिंदी नागरिकांना तांत्रिक शिक्षण देणें आणि धंदे चालविण्याची माहिती देणें एवढेंच बंधन त्यांच्यावर घालण्यांत आलें आहे. ज्या कंपन्यांतून आतां ब्रिटिश भांडवल गुंतविण्यांत येईल आणि ज्यांना भांडवल उभारण्याची परवानगी नुकतीच देण्यांत आली त्यांची यादी पुढें दिली आहे.

| कंपनीचें नांव | धंद्याचें स्वरूप | परवानगी दिलेलें भांडवल |
|---|---|---|
| (१) टी. आय. एक्सपोर्ट, लि. | सायकलीचे सांगाडे नळया, मच्छीमारीचें साहित्य | ३,००,००० रुपये |
| (२) जे. बी. अडवानी अँड को. मुंबई | छपाईची शाई | अधिकृत भांडवल २,५०,००० रु. पैकीं ६२,५०० रुपयांचे भाग. लॉरिला अँड बोल्टन, लंडन ह्या कंपनीला देण्यांत येतील. |
| (३) ब्रिटिश ड्रग हौसेस (इंडिया) लि. मुंबई | औषधें. | अधिकृत भांडवल १५,००,००० रु. पैकीं ५ लाख रुपयांचे भाग ब्रिटिश ड्रग हौसेस लंडन, कंपनी घेणार. |
| (४) थॉमस डब्ल्यू वॉर्ड (इंडिआ) लि. | शेतीचीं आणि विजेचीं हत्यारें व उपकरणें | अधिकृत भांडवल ५,००,००० रु. पैकीं १,२५,००० रुपयांचे भाग थॉमस डब्ल्यू. वार्ड लि., शेफिल्ड कंपनीला. |
| (५) कॅडबरी फ्राय (इंडिआ) लि. | चॉकोलेट्स आणि कनफेक्शनरी | अधिकृत भांडवल ५,००,००० रु. पैकीं ३,२४,७००रुपयांचे भाग ब्रिटिश नागरिकांना. |
| (६) कॉमटन अँड पार्किन्सन लि. | मद्रासमधील चालू कंपनी चालविणार | भांडवल १०,००,०००रु. |
| (७) जनरल इलेक्ट्रिक कंपनी (इंडिआ) लि. | विजेच्या सामानाची आयात व उत्पादन | भांडवल ५,००,००० रु. |
| (८) ई. ग्रीन अँड सन्स लि. | | अधिकृत भांडवल १००,००० रु. ७५,००० रुपयांचे भाग, ई. ग्रीन अँड सन्स लि. शेफील्ड ह्या कंपनीला. |
| (९) साउथ इंडिआ ड्रग अँड एसेन्स कं. लि. | औषधें | नवीन भांडवलास परवानगी ४८,००० रु. |
| (१०) इंडिअन क्राउन कॉर्क को. | बाटल्यांचीं बुचें | ४५,००० रुपये अधिक भांडवल उभारण्याची परवानगी. |

| कंपनीचें नांव | धंद्याचें स्वरूप | परवानगी दिलेलें भांडवल |
|---|---|---|
| (११) इंडो बेलजिअन इंजिनिअरिंग कं. अलाहाबाद | इंजिनिअरिंग | अधिकृत भांडवल ४,००,००० रु. पैकीं १ लाख रुपयांचे भाग एका बेलजिअन नागरिकाला. |
| (१२) अशोक मोटार्स लि. मद्रास. | मोटारी | अधिकृत भांडवल २,००,००,००० रुपये विक्रीस काढलेलें ५०,००,००० रु. पैकीं परकीय कंपनीला १,३७,००० रुपयांचे भाग |
| (१३) इंडिआ मायनिंग अँड कन्स्ट्रकशन कं. | खाणी व बांधकाम | विक्रीस काढलेलें भांडवल ४५,००,००० रु. पैकीं परकीय कंपनीला २३,००,००० रुपयांचे भाग. |
| (१४) दि उद्योग-विकास लि. | कॅमेरा, कच्ची फिल्म एक्स-रे फिल्म. | अधिकृत भांडवल २१,००,००० रु. अनेक परकीय कंपन्यांबरोबर भागीदारी. |
| (१५) फेअरली प्लेस सिक्युरिटीज लि. कलकत्ता. | होल्डिंग कंपनी | अधिकृत भांडवल ८२,००,००० रु. तीन पैकीं एक इंग्लिश आणि एक ऑस्ट्रेलियन डायरेक्टर |
| (१६) कॉमटन, पार्किन्सन वर्क्स लि. | विजेचे पंखे, मोटारी, इत्यादि. | नवीन ३९,००,००० रुपये भांडवल उभारण्यास परवानगी. ७४ टक्के नवीन भांडवल कॉमटन पार्किन्सन कंपनीला. |
| (१७) ड्रग्ज प्रॉडक्टस् को. लि. | औषधें | १५,००,००० रुपये भांडवलाची नवी कंपनी. पैकीं २,००,००० रुपयांचे भाग ड्रग प्रॉडक्टस् लि. ज्यू जेरेसी ( अमेरि- ह्या कंप- |
| (१८) डी. वॉल्डी अँड को. | लेड ऑक्साइड | २७,००,००० रुपयांचें नवीन भांडवल. |
| (१९) बंगलोर व्हाइटलेड सिंडिकेट लि. | | १७,००,००० रुपयांचें नवीन भांडवल मेसर्स ऑजिल्व्ही गिलँडर्स अँड कंपनीशीं महाणखताचा करार |
| (२०) काचार अँड डूर्स टी कं. लि. | चहाचे मळे | कंपनीचें वसूल भांडवल १,५३,००० पौंड. आणखी २०,००,००० रुपयांचें भांडवल उभारण्याची परवानगी. जार्डीन हेंडरसन लि. कलकत्ता कंपनीशीं महाणखताचा करार |

| कंपनीचें नांव | धंद्याचें स्वरूप | परवानगी दिलेलें भांडवल |
|---|---|---|
| (२१) एअर कंडि-शनिंग कॉर्पोरेशन लि.- | | नवीन १५,००,००० रुपयांच्या भांडवलास परवानगी. |
| (२२) वाल्डीज इंडस्ट्रीज लि. | | नवीन ८,००,००० रुपयांचें भांडवल. पैकीं ५००,००० रुपयांचा ऑजिल्व्ही गिलँडर्स अँड कंपनीला चार्ज |
| (२३) जेसप अँड को. लि. | | नवीन २५,००,००० रुपयांच्या भांडवलास परवानगी. मेसर्स जेसप अँड को. लि. लंडन कंप-नीला चार्ज |
| (२४) स्टीम अँड मायनिंग इक्विपमेंट (इंडिआ) लि. | खाणी | ६०,००० रुपयांच्या बोनस भागांसाठीं परवानगी. |

**रेशमाच्या धंद्यांत सुधारणा**—बंगलोर येथें ऑल इंडिआ सिल्क बोर्डाची पहिली बैठक नुकतीच झाली. हिंदुस्थानांत दरवर्षी २२ लाख पौंड कच्चें रेशीम तयार होतें. गरज मात्र ४० लाख पौंडांची आहे. म्हणून उत्पादन वाढवावें कसें, हा प्रश्न बोर्डापुढील प्रश्नांत सर्वांत महत्त्वाचा होता. म्हैसूर, मद्रास, आसाम आणि काश्मीर ह्या भागांतूनच बहुतेक रेशीम पैदा होतें. हिंदमध्यें रेशमाच्या धंद्यांत ६ लाख कुटुंबें काम करतात. रेशमाला अमेरिकेंत चांगली बाजार पेठ असल्यामुळें दुर्लभ असें डॉलर्सचें चलन मिळणें ह्या धंद्यामुळें शक्य आहे.

**सिमल्यांतील गलिच्छ वस्ती**—सिमल्यांतील २,००० भंगी व झाडूवाले ज्या भागांत रहातात तो भाग मनुष्यवस्तीला अयोग्य असल्याचें मत पूर्व पंजाबच्या मजूर मंत्र्यांनीं व्यक्त केलें. हा भाग परत बांधण्याचा सरकारचा विचार असून तोंपर्यंत ह्या भागांतील मजुरांसाठी दोन छावण्या उघडून त्यांत त्यांची व्यवस्था करण्याचें घाटत आहे.

**धरणाला सामुग्री किती लागते?**—पूर्व पंजाबमधील भाक्रा-नानगल ह्या धरणासाठी कोणती सामुग्री किती लागेल त्याचा अंदाज प्रसिद्ध झाला आहे. तो असा : सिमेंट ७० लाख टन; पोलादी सामान १,२०,००० टन; लाकूड, ११,००,००० घन-फूट; पेट्रोल, डिझेल तेल वगैरे २,३०,००,००० गॅलन्स.

**मागासलेल्या प्रदेशासाठी अमेरिकन योजना**— जगांतील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांच्या विकासासाठी अमेरिका २.५ कोटी डॉलर्सची एक योजना तयार करीत असल्याचें समजतें. ह्या रकमेपैकीं निम्मी रक्कम काँग्रेसनें मंजुरी दिल्यास अमेरिकन सरकार खर्च करणार आहे. बाकीची रक्कम संयुक्त-राष्ट्र-संघटनेंतील इतर धानिक राष्ट्रांनीं आणि मदत घेणाऱ्या राष्ट्रांनीं उभारावयाची आहे. योजनेंतील बराचसा पैसा मलेरिया सारख्या रोगांचें निर्मूलन करण्यासाठी खर्च व्हावयाचा आहे. त्यानंतर शेती सुधारणा आणि जंगलाची राखण ह्यांचा अनुक्रम आहे. शैक्षणिक दर्जा वाढविण्याची बाब त्यानंतर ठेवण्यांत आली आहे.


उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

**ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.**

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातर्डी, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठीं चौकशी करा:—

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५१९

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज (ले:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)

(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन (ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु.)

(३) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट (ले:—. रेवि अॅले, किं. २ रु.)

(४) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज अँड व्हिलेज इंडस्ट्रीज इन बाँबे प्रॉव्हिन्स (ले.:— एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ.)

**दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड**

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिस:—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. के. वि. केळकर M. A., LL. B. (वकील) (अध्यक्ष) | श्री. बी. बी. वाळवेकर (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०

विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०

वसूल भांडवल रु. ३,९८,२८५

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

## करपद्धतींत एकसूत्रता आणण्याची आवश्यकता

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेंत त्या देशांतील करपद्धतीला महत्त्वाचें स्थान असतें. कर घेण्याची पद्धत उद्योगधंद्यांना मारक होऊं लागली तर असे कर बसविण्यांत सरकारचा हेतु केवळ आपलें उत्पन्न वाढविण्याचाच आहे असा रास्त आक्षेप घेण्यांत येऊं लागतो. करपद्धतीनें देशांतील उत्पादनांत अडचणी न आणता सरकारला उत्पन्न मिळवून दिलें तर असा आक्षेप घेण्याचें कारण अर्थातच उरणार नाहीं. ह्या दृष्टीनें विचार करतां फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संस्थेचे अध्यक्ष श्री. जालन ह्यांनीं उपस्थित केलेले कांहीं मुद्दे मननीय आहेत. श्री. जालन ह्यांनीं हिंदचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू ह्यांना प्रचलित करपद्धतीविषयीं एक खलिता सादर केला आहे. त्यांतील मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणें आहेत. (१) निरनिराळया प्रांतिक सरकारांनीं बसविलेले कर परस्परांशी विसंगत, कांहीं वेळा परस्परविरोधी आणि गोंधळ उत्पन्न करणारे आहेत. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं विचारविनिमय करून कर-पद्धतींत एकसूत्रता आणणें जरूर आहे. ह्याबाबतींत समाधानकारक मार्ग निघत नसेल तर घटना बनविण्याचें काम चालू असतानांच सर्व हिंदुस्थानला उपयुक्त होईल अशी व्यवस्था करण्यांत यावी. (२) प्रांतिक सरकारांनीं निरनिराळया वस्तूंवर वेगवेगळया प्रमाणांत कर बसविल्यामुळें प्रांतांच्या सरहद्दी म्हणजे आर्थिक अडसर होऊन बसल्या आहेत. (३) प्रांतिक सरकारांनीं आपल्या बजेटांची तोंडमिळविणी करण्यासाठीं कांहीं कर बसविले आहेत. परंतु त्यांतील कांहीं करांचा तसा परिणाम होणार नाहीं. उदाहरणार्थ, विक्री कर आणि इतर अप्रत्यक्ष कर प्रांतिक सरकारांनीं चलनवृद्धीविरुद्ध उपाय म्हणून बसविले. परंतु हे कर अखेर गिऱ्हाइकाच्या माथीं बसत असल्यानें किंमतींत वाढ होईल आणि सरकारचा हेतु सिद्धीस जाणार नाहीं. (४) युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनांना मिळणारी मध्यवर्ती सरकारची मदत घेण्यासाठीं प्रांतिक सरकारांनीं ह्या योजनांचा बोजा आपल्या उत्पादनावर टाकला आहे. श्री. जालन ह्यांच्या मतें हा खर्च भांडवली स्वरूपाचा आहे. (५) गेल्या कांहीं वर्षांत प्रत्यक्ष कराचा बोजा फार वाढल्यानें, देशांतील श्रीमंत लोकांजवळ भांडवल गुंतविण्यासाठीं पैसा फारच थोडा शिल्लक राहिला आहे. श्री. जालन ह्यांनीं व्यक्त केलेल्या कांहीं विचारांशीं सरकार सहमत होईल असें वाटत नाहीं. तथापि करपद्धतींत एकसूत्रता असावी ही त्यांची मागणी योग्य आहे ह्यांत शंका नाहीं.

---

### मागणीपेक्षा अधिक उत्पादन करणारा साबणाचा धंदा

"हिंदुस्थानांतील साबणाच्या कारखान्यांत दरसाल २,२५,००० टन साबण तयार होऊं शकेल, परंतु १९४८ सालीं फक्त १,८०,००० टन साबण तयार झाला आणि देशाची मागणी १,२५,००० टनहि नाहीं. युद्धकाळांत साबणाचें उत्पादन वाढलें व हा साबण परदेशींहि जात होता. आतां मागणी नष्ट झाली आहे व कारखान्यांतून तयार माल पडून आहे. लोकांचें जिनसा विकत घेण्याचें सामर्थ्य कमी झालें आहे त्यामुळें ते साबण पूर्वीपेक्षा कमी वापरूं लागले आहेत. उत्पादन खर्च उतरवून साबण स्वस्त करण्याचा प्रयत्न कारखानदार करीत आहेत. अशा परिस्थितींत, परदेशीय भांडवलास ह्या धंद्यांत वाव मिळूं देणें श्रेयस्कर होणार नाहीं. दक्षिण हिंदुस्थानांत एक विदेशी भांडवलाचा कारखाना स्थापन होणार आहे असें समजतें":--ऑल इंडिया सोप मेकर्स असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. एस. पी. गोदरेज

अर्थ

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : ४ आ.

*जाहिरातीचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:–

"अर्थ"

"*दुर्गाधिवास*" पुणें ४.

**कूळ व शेत-जमीन कायदा**

१९४८

प्रसिद्ध झाला. साधी बांधणी किं. ४ रु; उत्तम कागद व बांधणी ५ रु; कूळकायदा (१९३९) तिसरी आवृत्ति किं. ३ रु.; दोन्ही कूळ कायदा सवलतीची किंमत साधी बांधणी ५ रु. व मजबूत बांधणी ६ रु.; मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु.; शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४ व ४॥ रु.; घरभाडें नियंत्रण कायदा किं. २ रु.; द्विभार्याप्रतिबंधक कायदा दुसरी आवृत्ति, किं. १ रु.; हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु.

नवीन कूळ कायद्याप्रमाणेंच्या खंडाच्या पावत्या. २५ पावत्यांच्या पुस्तकास ८ आणे.

पत्ता— लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.




हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.